महाराष्ट्र पोलीस
ठाणे ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण
(आस्थापना शाखा)
एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर अळी, पोलीस स्कुलसमोर,
ठाणे ग्रामीण-४००६०१
E-mail id-sp.thane.r@mahapolice.gov.in/sheetbranch.thane.r@mahapolice.gov.in
Fax NO .022-25304873 Phone No 022-2534278/2530488

जा.क्र.पोअ/ठाग्रा/आशा-१/पोशि भरती २०२४-२५/लेखी परिक्षा/ ११० /२०२६ दिनांक २६ /०३/२०२६

# ठाणे ग्रामीण पोलीस शिपाई भरती - २०२४-२०२५

## लेखी परिक्षा

## -: उमेदवारांना सुचना :-

१.ठाणे ग्रामीण पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ मधील पोलीस शिपाई पदाच्या लेखी परिक्षेकरीता पात्र १८६२ उमेदवारांची **लेखी परिक्षा रविवार दि.२९/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.ते दुपारी १२.३० वा.** यावेळेत खालील नमुद परिक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी त्यांना महाआयटी विभागाकडुन निर्गमित केलेल्या लेखी परिक्षेच्या बैठक क्रमांकानुसार वाटप केलेल्या परिक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

| Sr. No. | Name of Exam Center | Number Of Candidate | Exam Date and Exam Time | Seat No. |
|---|---|---|---|---|
| 1 | SARSWATI HIGH SCHOOL AND JUNIUR COLLEGE, PACHAPAKHADI, NEAR PRASHANT SWEET CORNER, NAUPADA, THANE. PIN CODE - 400 602 | 820 | Date - 29/03/2026 11.00 AM to 12.30 PM | 100001 to 100820 |
| 2 | K.C. COLLEGE OF ENGINEERING AND MANAGEMENT STUDIES AND MITHBANDAR ROAD, KOPARI, THANE EAST 400 603. | 630 | Date - 29/03/2026 11.00 AM to 12.30 PM | 100821 to 101450 |
| 3 | VIDYA PRASARAK MANDAL, DR.BEDEKAR VIDYAMANDIR (MARATHI), NAUPADA, THANE (W.) 400602 | 270 | Date - 29/03/2026 11.00 AM to 12.30 PM | 101451 to 101720 |
| 4 | PEOPLES EDUCATION SOCIETY, GLOBAL SCHOOL, MITHBANDAR ROAD, ASHTAVINAYAK CHOWK, KOPARI (E), THANE | 142 | Date - 29/03/2026 11.00 AM to 12.30 PM | 101721 to 101862 |
| | TOTAL | 1862 | | |

२. उमेदवारांनी लेखी परिक्षेकरीता परिक्षा केंद्रावर <u>सकाळी ८.०० वाजेपर्यंत हजर</u> रहावे.

३. <u>मुख्य प्रवेशद्वार ०८.३० वाजता बंद</u> केले जाईल त्यानंतर कोणत्याही उमेदवारास परिक्षाकेंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

४. उमेदवारांनी लेखी परिक्षेकरीता केंद्रात प्रवेश करतांना त्यांचेजवळ मैदानी चाचणीच्या वेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व महाआयटी कडुन अदा केलेल्या लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र असतील तरच उमेदवारास प्रवेश देण्यात येईल तसेच उमेदवाराकडे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमुद केलेले फोटोच्या दोन प्रती असणे आवश्यक आहे.

५.उमेदवारांनी स्वत:ची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेल्या आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, पासपोर्ट, महाविद्यालयीन ओळखपत्र, वाहन परवाना यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र सोबत आणावे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

६.OMR मधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण

७.उमेदवारांना लेखी परिक्षेकरीता या कार्यालयाकडुन काळे बॉल पॉईंट पेन व लेखनासाठी पॅड पुरविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी स्वत: पेन, पेन्सिल, खोड रबर परीक्षा केंद्रावर नेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे तसेच सोबत येतांना इतर अनावश्यक वस्तु आणु नये, आणल्यास सदरच्या वस्तु परिक्षा केंद्राच्या बाहेर ठेवण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

८.उमेदवारास परिक्षा केंद्रात घड्याळ, भ्रमणध्वनी, ब्लु टुथ, बटण कॅमेरा, पेन कॅमेरा, इलेक्ट्रानिक गॅझेट, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, कॅमेरा डिव्हाईस /कॅल्क्युलेटर / डिजीटल नोड पॅड / नोटस पुस्तके/ ईअरफोन/ हिअरींग एड डिव्हाईस/स्मार्ट वॉचेस/ स्मार्ट आय ग्लासेस इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होवु शकतो असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. तपासणीमध्ये असा करणारा उमेदवार आढळुन आल्यास त्यास त्याचक्षणी बाद ठरवुन त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम २०२४ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९.लेखी परिक्षेस उपस्थित राहिलेला उमेदवार डमी आढळल्यास / सुचना देवुनही मोबाईल अथवा ब्लु टुथ किंवा कॉपी करण्यासारखे इतर डिव्हाईस वापरतांना आढळल्यास त्याचवर त्वरीत कायदेशीर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१०. एखादा उमेदवार लेखी परीक्षेस गैरहजर राहील्यास, त्याला पुन्हा लेखी परिक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरीक्त संधी देण्यात येणार नाही. त्याला संपुर्ण भरती प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

११.उमेदवार अथवा त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट/दलाल, अधिकारी/कर्मचारी यांच्या भुलथापांना/अमिशाला बळी पडु नये. उमेदवारांची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

लेखी परिक्षेकरीता पात्र उमेदवारांच्या लेखी परिक्षा केंद्राची यादी, लेखी परिक्षेची तारीख, वेळ व ठिकाण याबाबतची माहिती या कार्यालयाचे संकेतस्थळ www.thaneruralpolice.gov.in, मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संकेतस्थळ www.mahapolice.gov.in व महाआयटी विभागाचे policerecruitment2025.mahait.org, या तिन्ही संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ठिकाण - ठाणे ग्रामीण
दिनांक - २६/०३/२०२६

( अनमोल मित्तल )
अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण

पोलीस अधीक्षक
सत्यमेव जयते
ठाणे ग्रामीण